**महाराष्ट्र शासन**
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन,२५, मर्झबान पथ,फोर्ट, मुंबई-४०० ००१.

क्र. आयटी-२०१६ /प्र.क्र.५९/ मातंक दि. २२ मे,२०२५.

**प्रति,**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी,
   जिल्हा परिषद (सर्व)
2. मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
   जिल्हा परिषद (सर्व)

**विषय** :- जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टीम ,(ZPFMS) या प्रणालीसाठी वित्तिय वर्ष २०२४-२५ अखेर करावयाच्या कामकाजाबाबत.

**संदर्भ**:-

१. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.आयटी-२०१६/प्र.क्र.५९/मातंक, दि. १४ ऑक्टोबर,२०२०.

२.ग्रामविकास विभागाचे पत्र क्र. झेडपीए -२०२५/प्र.क्र.४१ / मातंक दिनांक १० मार्च,२०२५.

३.ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आयटी-२०१६ /प्र.क्र. ५९ (भाग-२) / मातंक दिनांक २५ मार्च,२०२५

४.ग्रामविकास विभाग, पत्र क्रमांक आयटी-२०१६ /प्र.क्र.५९/ मातंक दिनांक ०४ एप्रिल,२०२५.

५.जिल्हा परिषद, पुणे, सांगली, बीड, परभणी, पालघर, सिंधुदुर्ग, रायगड, अमरावती, वर्धा, गडचिरोली, हिंगोली, जळगाव यांचे विनंतीचे पत्र.

विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र.४ येथील शासन पत्र समक्रमांक दि.०४ एप्रिल,२०२५ अन्वये, जिल्हा परिषद फंड मॉनेटरिंग प्रणालीमध्ये वार्षिक लेखा सन २०२४-२०२५ चे लेखांकन पुर्ण करण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार लेखांकन दि ३० एप्रिल,२०२५ पर्यंत पुर्ण करणे आवश्यक होते. तथापि, जिल्हा परिषद फंड मॉनेटरिंग प्रणाली वरील ३० एप्रिल,२०२५ अखेरची तपशीलवार लेखाकंन स्थिती पाहता,जिल्हा परिषदांचे लेखाकंन हे विहित वेळेत पुर्ण झाले नसल्याचे दिसून येते.

सदर लेखाकंन पूर्ण करण्यासाठी वाढीव कालावधी देण्याबाबत जिल्हा परिषदांकडून शासनास विनंती करण्यात आली आहे.सदर बाब विचारात घेऊन आता सर्व जिल्हा परिषदांकरीता लेखांकन पूर्ण करण्यासाठी दि. २७.५.२०२५ ते दि. २८.५.२०२५ रोजीचा कालावधी देण्यात येत आहे. या कालावधी नंतर लेखांकनासाठी कोणताही वाढीव कालावधी शासनाकडून देण्यात येणार नाही.

उपरोक्त कालावधीमध्ये लेखांकनाचे काम पूर्ण न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी. जिल्हा परिषद फंड मॉनेटरिंग प्रणालीवर MAS Slip मुद्रीत झालेली आहे. मात्र सदर स्लीप अनावश्यक पणे काढण्यात आल्या असतील तर त्या उपरोक्त कालावधीत प्रणालीवरुन रद्द करव्यात.

Digitally signed by
PRASHANT VINAYAKRAO PATIL
Date: 22-05-2025 14:59:21

(प्रशांत पाटील)

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर.**

१. प्रधान सचिव (ग्रामविकास) यांचे स्वीय सहाय्यक, ग्रामविकास विभाग,
२. विभागीय आयुक्त, (सर्व)
३. उपसचिव (वित्त) बांधकाम भवन, ग्रामविकास विभाग, फोर्ट, मुंबई.
४. अवर सचिव (वित्त-६), ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
६. श्री.राजेंद्र मधुकर डोंगरे, राज्य समन्वयक तथा सहाय्यक लेखाधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर.
७. श्रीमती संजीवनी रुपेश घरत, राज्य समन्वयक तथा कनिष्ठ लेखाधिकारी, जिल्हा परिषद, रायगड.
८. श्री. मंगेश सावळीराम जगताप, राज्य समन्वयक तथा कनिष्ठ लेखाधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.
९. महा प्रबंधक, बँक ऑफ महाराष्ट्र, लोकमंगल, १५०१ शिवाजीनगर, पुणे-४११००५.
१०. निवड नस्ती (कार्यासन-मातंक), ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.